**कृपया प्रसिध्दीसाठी** **30 एप्रिल 2009**

## राम नाईक यांचे मतदारांना धन्यवाद

**मुंबई, गुरुवार :** भाजपा-शिवसेना युतीचे उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील उमेदवार श्री. राम नाईक यांनी मतदानाचा हक्क बजावल्याबद्दल उत्तर मुंबईच्या सर्व मतदारांचे आभार मानले आहेत. "मतदारांचा कौल मतपेट्यांमध्ये बंद झाला असला, तरीही उत्तर मुंबईचे मतदारांनी माझ्यासाठी निर्णायक मतदान केले असेल असा माझा विश्वास आहे," असेही यावेळी श्री. राम नाईक म्हणाले.

मतदानाच्या दिवशी उत्तर मुंबईतील सहा विधानसभा क्षेत्रातील सोळा लाखांहून अधिक मतदारांना भाजपा कार्यालयांमधून तसेच वैयक्तिक पातळीवरही कार्यकर्ते संगणकाद्वारे नावे शोधून देत होते. पन्नासहून अधिक ठिकाणी अशी व्यवस्था उपलब्ध होती. श्री. राम नाईक यांनी मतदान सुरु असताना वेगवेगळया मतदान केंद्रांना भेट दिली. त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व उत्तर मुंबईचे अध्यक्ष श्री. योगेश सागर, तसेच भाजपा मुंबईचे अध्यक्ष श्री. गोपाळ शेट्टी यांनीही उत्तर मुंबईतील अनेक मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रिया सुरळीत चालू आहे ना याची खात्री केली.

मतदारांच्या उत्स्फुर्त प्रतिसादाबद्दल मतदारांचे, कार्यकर्त्यांचे तसेच निवडणूक प्रक्रियेतील सर्व कर्मचाऱ्यांचे श्री. राम नाईक यांनी आभार मानले आहेत.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**